जा.क्र. २१/२३
धर्मादाय आयुक्त भवन,
२ रा मजला, सस्मिरा इमारत,
सस्मिरा रोड, वरळी,
वरळी-४०००३०.
दूरध्वनी क्र. ०२२- २४९३५४३४,
२४९३५४९०, २४९३०४९९.

**परिपत्रक क्र. ६०६ दिनांक ०२.०१.२०२४**

विषय :- धर्मादाय रुग्णालयातील आरक्षित खाटा निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्याकरिता विशेष मदत कक्ष स्थापन करणेबाबत.

संदर्भ :-१. विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक समिती २५२३/प्र.क्र.५८/का.१५, दिनांक:३१ ऑक्टोबर, २०२३.

२. शासन निर्णय, विधि व न्याय विभाग, क्र. लवेसू-२०१०/७३/(११) का.१५, दिनांक २२/०७/२०२०.

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक समिती २५२३/प्र.क्र.५८/का.१५ अन्वये रुग्णालय योजनेची अंमलबजावणी योग्यपणे व प्रभावीपणे करण्यासाठी संदर्भ क्र.२ अन्वये गठीत केलेल्या जिल्हास्तरीय समितीचे पुनर्गठन करण्यात आले आहे व मा. मंत्री (विधि व न्याय) यांच्या कार्यालयाच्या धर्मादाय रुग्णालयातील आरक्षित खाटा गरीब रुग्णांना उपलब्ध करून देणे व त्यावर देखरेख ठेवण्यासठी राज्यस्तरीय विशेष मदत कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. सदर राज्यस्तरीय विशेष मदत कक्षाचे प्रमुख म्हणून श्री. रामेश्वर नाईक हे कामकाज पाहत आहेत. सदर कक्षाची कार्यकक्षा व अधिकारामध्ये धर्मादाय रूग्णांलयातील निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी आरक्षित खाटा पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे संपूर्ण अधिकार त्या कक्षास आहेत.

सबब, याद्वारे सर्व धर्मादाय रुग्णालयांना निर्देशित करण्यात येते कि, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक समिती २५२३/प्र.क्र.५८/का.१५ अन्वये गठीत केलेल्या राज्यस्तरीय विशेष मदत कक्ष अथवा पुनर्गठीत केलेल्या जिल्हास्तरीय समितीमार्फत देण्यात आलेले निर्देश, सूचना यांची रुग्णालय योजना व महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ४१ क क अन्वये काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

2.01.2024

(महेंद्र के. महाजन)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत:

१. परिपत्रक धारिणी.
२. विधि व सल्लागार-नि-सह सचिव, विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन.
३. राज्यस्तरीय विशेष मदत कक्ष, मा. उपमुख्यमंत्री(गृह, विधि व न्याय) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई
४. सर्व धर्मादाय सह आयुक्त / धर्मादाय उप आयुक्त / सहायक धर्मादाय आयुक्त
५. अधीक्षक (रुग्णालय शाखा/ अस्थापना शाखा), मुख्यालय
६. संगणक शाखा, मुख्यालय (प्रत संकेतस्थळावर अपलोड करण्यासाठी)
७. सर्व धर्मादाय रुग्णालये.